एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

(विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विध्यापीठ, नांदेड मानव विज्ञान शाखेतील अर्थशास्त्र या विषयात विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवीकरीता संशोधन पूर्व सादर केलेला शोध सारांश

संशोधिका
रोहिणी दत्तात्रय सोनवणे
(एम. ए. अर्थशास्त्र, बी.एड.)

संशोधन मार्गदर्शक
प्रा. डॉ. बाभूळगावकर किशन एस.
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, बसमत

संशोधन केंद्र
पिपल्स महाविद्यालय नांदेड
ता. नांदेड जि. नांदेड

ऑगष्ट - २०२३

एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास
(विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा)

१. प्रस्तावना :

भारतीय समाजात स्त्रीची ओळख पुरुषांशी जोडली गेली आहे. पुरूष नसलेल्या स्त्रीयांना एकतर गरीब, लाचार, अबला, कलंकिन किंवा वाईट चारीत्र्याच्या नावाने सबोधतात.पुरुषसत्ताक आणि संरजामशाही समाजव्यवस्थेने एकटे राहणे मान्य केले नाही आणि सन्मान दिला नाही. एकल घटस्फोटित परिस्थितीमुळे अविवाहित, अविवाहित माता यांना समाजाने कधीच मान्यता आणि सन्मान दिला नाही. परिणामी या अविवाहित स्त्रियां आर्थिक साधनांशिवाय स्वत:च्या हिमंतीवर उभ्या आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार भारतात एकल स्त्रियांच्या संख्येत वाढ झालेली दिसून येते. २००१ च्या आकडेवारीनुसार देशांतील एकल स्त्रियांचे प्रमाण ५१.२ दशलक्ष म्हणजेच पाच कोटी बारा लाख इतकी आहे. तर २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार ती वाढून ७ कोटी १४ लाख एवढी झाली. वयोगटानुसार हे प्रमाण पाहिले तर २५ ते २९ वयोगटातील स्त्रियांचे प्रमाण २३ टक्के इतके आहे. २०११ च्या आकडेवारीनुसार हे प्रमाण ६८ टक्के इतके वाढले आहे. त्यामध्ये २ कोटी ९२ लाख एकल आहे, तर १ कोटी ३२ लाख अविवाहित स्त्रिया आहेत. एकुण आकडेवारीतील ४ कोटी ४४ लाख म्हणजे ६२ टक्के एकल स्त्रिया ग्रामीण भागातील आहेत. तर ५८ टक्के शहरी भागातील आहेत. २०११ च्या आकडेवारीनुसार भारतातील एकल स्त्रियांचे प्रमाण अधिक असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे.

काळाच्या बरोबरच महिलांच्या उन्नतीसाठी आणि विकासासाठी शासन आणि समाजसुधारकांनी अनेक पावले उचलली, पण या सगळ्यात एकल महिला वंचित राहिल्या. घराघरात आणि घराबाहेर रात्रंदिवस काम करणाऱ्या स्त्रिया अविवाहित असताना घराच्या आणि कुटुंबाच्या संपत्ती पासून वंचित

राहतात. पतीच्या मालमत्तेत कायदेशीर हक्क असूनही एकल महिलांना त्यांचा हिस्सा क्वचितच संयुक्त कुटुंबात राहण्यासाठी स्वातंत्र्य व्यवस्था दिली जाते. घर, सुरक्षा, रोजगार या त्यांच्या प्रमुख गरजा आहेत. अर्थ, शिक्षण, आणि माहितीच्या अभावामुळे ते फसवणुकीचे बळी ठरतात. भारतीय ग्रामीण समाजातील अविवाहित महिलांची स्थिती तर आणखीन वाईट आहे. अविवाहित राहिल्यानंतर आणि मुलांसह संघर्षमय जीवन जगण्यास भाग पाडल्यानंतर तिला तिची मुले आणि तिचा उद्धवनिर्वाह या दोन्हीकडे लक्ष द्यावे लागते. दिवसाचे बारा ते सोळा तास काम करूनही त्याच्याकडे मुलांचे पालन पोषण करण्यासाठी पुरेसे उत्पन्न नाही.

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना शासकीय सुविधा मिळतात, मात्र या महिला मुलांसह राहत असतानाही त्यांना कौटुंबिक दर्जा देण्यात आला नाही परिणामी या एकल महिलांना दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा लाभ मिळत नाही.

वैदिक काळात भारतीय महिलांना समाजात व कुटुंबात महत्त्वाचा स्थान होते. तेव्हा स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जात नसे. अखंड भारत हा विदयुषी महिलांमुळे गाजला गेला. त्यात लोपामुद्रा, धोषा, गार्गी यांचा उल्लेख येतो. वेदकाळापासून आर्यकाळापर्यंत अनेक विदयुषी भारतात निर्माण झाल्या. वैदिक काळात स्त्री ही घरची स्वामिनी होती, परंतु वेदोंतर काळात महिलांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अधिकार नाकारला, जाऊन महिलांचा सामाजिक दर्जा घसरला. महात्मा फुले, राजाराम रॉय, रानडे, आंबेडकर, केशव कर्वे, इत्यादी. समाजसुधारकांनी आपल्या वैचारिक लेखन प्रबोधन प्रत्यक्ष कृतीतून महिलांच्या विकासाला सुरुवात केली.

स्त्री-पुरुष ही संख्या ही संसार आणि समाज रथाची दोन चाके असल्याचे आपण मानतो, परंतु नैसर्गिक आणि मानवी वर्तनाच्या गुंतागुंतीमुळे अनेकदा यात असमतोल निर्माण होत असल्याचे आपण पाहतो. एकल महिलांचा प्रश्न हा असाच एक महत्त्वपूर्ण प्रश्न आहे एकल महिला म्हणजे सिंगल वुमन होय. एकल महिलांमध्ये एकल, परीक्तता, घटस्फोटीत

महिला(पोटगी मिळत नाही) अशा प्रौढ कुमारीका, कुमारी माता, देवदासी यांचा समावेश होतो.

एकल नारीशक्ती संघटनेने एका दशकाहून अधिक काळ केलेल्या अभ्यासात आणि कामात असे आढळून आले आहे की, एकल महिलांची संख्या २००१ च्या मानाने वाढतच आहे आकडेवारी आणि वस्तुस्थितीच्या विश्लेषणातून त्यांच्यासाठी स्वातंत्र्य धोरण तयार करण्याची गरज आहे का? एकल महिलांचे आर्थिक व सामाजिक मूल्यमापन लक्षात घेऊन त्यासाठी धोरणात्मक योजना तयार केल्या जाव्यात का? ते महत्त्वाचे आहे का? हव्या प्रश्नाचे उत्तर शोधणे गरजेचे आहे. एकल महिलांना मिळणाऱ्या आर्थिक सवलती अभ्यास जनजागृती ह्याच गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

एकल महिला ह्या समाजाच्या महत्त्वाचा भाग आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी शासकीय योजना कोणत्या आहेत? या योजनेचा लाभ त्या घेतात का? एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थिती कशी आहे? शासकीय योजनांचा लाभ एकल महिलांना किती प्रमाणात होतो याचा अवलंब कसा होतो त्याचा फायदे कितपत होतात? एकल महिलांचा शिक्षणाचा प्रमाणात वाढ झाली का? या अनुषंगाने एकल महिला आर्थिक आणि सामाजिक समस्येच्या अभ्यास करणे गरजेचे वाटते व त्यानुसार हा विषय अभ्यासण्यासाठी निवडण्यात आला आहे.

२. एकल महिला अर्थ आणि व्याख्या :

एकली स्त्री ही पाश्चात्य संकल्पना भारतीय संकल्पनेच्या अगदी विरुद्ध आहे पाश्चिमात्य देशांमध्ये स्त्री स्वातंत्र्य म्हणजे स्वातंत्र्याच्या विविध मर्यादा, इच्छाशक्ती, एक मार्ग असतो, अशी म्हण आहे, तिथे स्त्री आर्थिक गुलाबगिरीतून बाहेर पडते आणि या आर्थिक स्वातंत्र्यातून तिच्या जीवनाचे नवे आयाम खुले होतात, पण याउलट भारतातील एकटया स्त्रीचे जीवन अपमानास्पद आहे. अशा परिस्थितीत एकल भारत आणि भारतीय महिलांच्या संकल्पना वेगळ्या आहेत.

एकटया राहणाऱ्या परित्यक्ता, घटस्फोटीत, एकल, अपंग किंवा अविवाहित महिलेला एकल महिला म्हणतात.

मनुष्य जसा बुद्धिजीवी प्राणी आहे, तसा तो समाजशील प्राणी देखील आहे. म्हणूनच समाजातील अनेक घटकांचा, त्याच्या संबंधित कारणांचा शोध घेण्याची एक आंतरिक इच्छा मनुष्यात असते. यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो हिच जिज्ञासा अनभिज्ञ गोष्टींबाबत न मिळविण्यास किंवा नवीन ज्ञान प्राप्तीस आधार ठरते. यातूनच संशोधनाचा मार्ग सुलभ बनत जातो, यानंतर हे संशोधन म्हणजे काय ? याचा अर्थ आपण लक्षात घेतल्यास समजते, की संशोधन या शब्दास इंग्रजी भाषेत Research असे संबोधले जाते. Re (पुन्हा) search (शोधणे) म्हणजे एखाद्या गोष्टींचा पुन्हा पुन्हा शोध घेणे व नवीन शोध लावणे. वेबस्टरच्या शब्दकोशानुसार "संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्य शोधण्यासाठी आणि जुने तत्वे अथवा तथ्ये यांचे पुनः पुन्हा परीक्षण करण्यासाठी केलेला चिकित्सक पद्धतशीर अभ्यास होय, खऱ्या अर्थाने संशोधन म्हणजे "वैज्ञानिक पद्धती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची अधिक नियमबद्ध आकारबद्ध, सुव्यवस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया आहे. अशी प्रक्रिया कधी संपत नाही. कारण संशोधन हा एक प्रवाह आहे, जो सतत सुरू राहतो. मानवी जीवनातील व्यवहारातील समाजातील आणि संपूर्ण सृष्टीतील विविध प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी एक प्रकारचा व्यवस्थित व संघटित प्रयत्न केला जातो. यातूनच ज्ञानाची कक्षा रूंदावते आणि हे ज्ञान व्यवहारिक दृष्ट्या कितपत साहाय्य ठरते हे पाहिले जाते. थोडक्यात एस. स्लीसिंजर आणि एम स्टिव्हन्सन यांच्या मते, "ज्ञानाच्या कक्षा विस्तारीत करणे, त्याची अचूकता तपासणे आणि सिद्धांताच्या मांडणीसाठी किंवा कलेच्या व्यावहारिक उपयोगासाठी हे ज्ञान कितपत साहयभूत ठरते. हे पाहण्यासाठी शास्त्रीय पद्धती शोधून काढणे त्यांचे विश्लेषण करणे आणि सामाजिक जीवनाच्या संकल्पना मांडणे म्हणजे सामाजिक संशोधन होय.

३. संशोधन विषयाची ओळख व निवडीचे कारण :

प्रस्तुत संशोधनाचा विषय " एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) " या संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातील एकल महिलांच्या वैयक्तिक पार्श्वभूमी सोबत कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक, शारीरिक समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनासाठी या विषयाची निवड करण्यामागच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण म्हणजे संशोधीकेस या विषयाची असलेली आवड त्याचबरोबर संशोधिका नांदेड जिल्ह्यातील रहिवासी असल्याकारणास्तव वेळ, पैसा आणि एकल महिलांच्या मुलाखती घेण्याच्या दृष्टिकोनातून सुलभ होण्यास मदत होईल त्यामुळे या विषयावर संशोधन होणे आवश्यक आहे अविवाहित, विवाहित, उच्चशिक्षित किंवा घटस्फोटित यांच्या तुलनेत एकलमहिलांच्या समस्यांवर संशोधन कमी झाल्याचे जाणवते. कुटुंबात व समाजात दुर्लक्षित झालेला एक घटक म्हणजे एकल होय. त्यासाठी त्यांच्या वैयक्तिक माहिती सोबत कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक, शारीरिक अशा सर्व समस्यांना एकल महिला कशा प्रकारे सामोरे जातात ? याचा उलगडा या अध्ययनातून करणे संशोधकास आवाहन होते. शासन एकल महिलासाठी योजना राबवते; परंतु प्रत्यक्षात सर्व एकल महिलांपर्यंत त्याचा लाभ मिळत नाही. यामागील कारणांचा शोध घेणे व अशा समस्यांवर उपाय सुचवणे संशोधिकेला महत्त्वाचे वाटले. तसेच हे संशोधन एकल महिलांच्या जीवनात सुधार करण्यासाठी त्यांचे कल्याण करण्यासाठी, यातून निष्पन झालेल्या निष्कर्षातून शासन किंवा सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना विविध योजना, कायदे किंवा धोरणे आखण्यास हे संशोधन मार्गदर्शक ठरू शकेल. मूळ समस्येला अधिक वस्तुनिष्ठ दृष्टीने सामोरे जाणारे ठरू शकेल. असा विचार करून या विषयाची निवड करण्यात आली.

४. संशोधन विषयाचे महत्त्व :

एकल महिलांविषयी झालेल्या पूर्वलिखित साहित्याचे अध्ययन केल्यास लक्षात आले की, या विषयासंबंधित विविध पैलूंवर काही प्रमाणात अभ्यास झालेला आहे. पूर्वीपासून समाजसुधारकांनी विधवांसाठी कार्य केल्याचेही दिसते शासनही विविध योजना, धोरणे, कायदे यामार्फत एकल महिलांच्या कल्याणासाठी कार्य करत आहे; परंतु प्रत्यक्षात जेवढी प्रगती बदल अपेक्षित आहे तो मात्र दिसून येत नाही. एकल महिला आजही अनेक बंधनातच आपले जीवन जगताना दिसून येतात. पती निधनानंतर पुनर्विवाहास विरोध आणि समाजाची वाईट नजर सहन करत, सर्व समस्यांना सामोरे जात त्या कशा प्रकारे जिवन जगतात ? एकल महिला कोणत्या आवश्यक गरजांपासून वंचित राहतात ? या वंचितपणाचा काय परिणाम होतो ? हे जाणून घेण्याच्या उद्देशाने या विषयाची निवड करण्यात आली. त्याचबरोबर एकल महिलांना सामोरे जावे लागणाऱ्या या समस्यांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केल्यास वंचितपणास कारणीभूत घटक अभ्यासातून समोर येण्यास देखील मदत होईल. यातून सर्व स्तरातील एकल महिलांच्या विकासासाठी परिवर्तन घडवणे किंवा काही नवीन पाऊले उचलणे सोपे जाईल, थोडक्यात शासनाला इतर सामाजिक संस्थांना एकल महिलांच्या कल्याणासाठी, त्यांच्या समस्यांवर उपाययोजना करण्याच्या हेतूने हे संशोधन उपयुक्त ठरेल. यातून संशोधन विषयाचे महत्त्व लक्षात येते. त्याचबरोबर एका संशोधन विषयातून सर्व वयोगटातील एकल महिलांच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक आणि शारीरिक समस्यांचा शोध घेण्यात आलेला आहे. यामुळे एकल महिलांचे जीवन सुधारण्यासाठी काही नवीन पाऊले उचलण्यासाठी हे संशोधन कार्य नक्कीच मार्गदर्शक ठरू शकेल. यातून एकल महिलांसोबत शासन आणि समाजाचा देखील फायदा होऊ शकतो. उदा. व्यावसायिक प्रशिक्षणातून एकल महिलांना स्वाभिमानाने काम करून जगण्याची, रोजगार मिळवण्याची संधी मिळेल. उद्योजकांना मनुष्यबळ, समाजाला नवीन उत्पादक साधने आणि शासनाच्या

तिजोरीत वाढ झाल्याने नवनवीन कल्याणकारी योजना निर्माण करता येतील. एकल महिलांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत तसेच इतर सामाजिक कार्यक्रम राबवता येतील. अशा सुशिक्षित व प्रशिक्षित एकल महिलांद्वारे समाजातील शाळा, महाविद्यालये, अनाथालय, वृद्धाश्रम इत्यादी ठिकाणी कौशल्यविकास, योगा, मनोरंजक कार्यक्रम, प्रेरणादायी भाषणे अशा प्रकारचे कार्यक्रम राबवूण यात एकल महिलांचा सहभाग वाढवता येऊ शकेल, यातून अशा महिलांना सर्व क्षेत्रात जाण्यास संधी मिळेल. त्यांनाही आनंदाने, स्वाभिमाने जीवन जगता येईल. एकल महिलांच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष समस्या काही प्रमाणात दूर होण्यास मदत होईल. एकाकी जीवन जगणारी एकल आपल्या कुटुंबाचा चांगल्या प्रकारे सांभाळ करत आनंदी जीवन जगेल असे विविध पैलू व्यवस्थितरीत्या लक्षात घेतल्यास या संशोधन विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे समजते.

५. संशोधन साहित्याचा आढावा :

५.१ कवडे योगेश, २०१८ :

'राजर्षी शाहू महाराजांनी केलेला विधवा पुनर्विवाह कायदा आणि सद्यस्थिती : एक आकलन' डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समाजिकशास्त्रे या विभागाअंतर्गत सादर करण्यात आलेला अप्रकाशित लघु शोधप्रबंध.

संशोधकाने या लघु-शोधप्रबंधात विधवा पुनर्विवाह कायद्याविषयी सविस्तर अध्ययन केल्याचे दिसून येते. त्याचबरोबर अठराव्या शतकापासून ते २१ व्या शतकापर्यंत विधवांची स्थिती, राजर्षी शाहूंनी निर्माण केलेल्या विधवा पुनर्विवाह कायदा, पुनर्विवाहासंबंधित समाजाचा दृष्टिकोन, विधवा महिलांना पुनर्विवाहाचा अधिकार, तसेच या कायद्याविषयी विधवा महिलांमधील जागृती इत्यादीविषयी संशोधनात अभ्यास केल्याचे दिसून येते. त्यासाठी संशोधकाने औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील ५० विधवा महिलांची निवड गैरसंभाव्य नमुना निवड पद्धतीतील 'स्नोबॉल नमुना निवड' या पद्धतीने

केली. अध्ययनाच्या निष्कर्षावरून असे लक्षात आले की, विधवा महिलांचा सामाजिक दर्जा कनिष्ठ आहे. एकूण 'उत्तरदात्यांपैकी ६२% उत्तरदात्यांना कुटुंबातील शुभ कार्यात सहभागी करून घेतले जात नाही. त्याचबरोबर ३० विधवांना महिलांविषयी एकही कायदा माहिती नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच ८४% उत्तरदात्यांना विधवा पुनर्विवाह करण्याची इच्छा नव्हती तर ६८% उत्तरदात्यांच्या माहितीत एकही पुनर्विवाह झाला नव्हता.

यावरून लक्षात येते, की विधवा पुनर्विवाहाबाबत जाणीव जागृतीचे प्रमाण कमी आहे. आज सुद्धा समाज पूनर्विवाहास मान्यता देत नाही, असे या संशोधनातून समोर आल्याचे दिसून येते.

५.२ शर्मा पिंकी, २०१८:

'विधवा, तलाकशुदा एवं अविवाहित महिलाओं की सामाजिक एवं आर्थिक स्थिती का एक समाजशास्त्रीय अध्ययन' मोहनलाल सुखाडिया विश्वविद्यालय, उदयपूर, राजस्थान च्या सामाजिकशास्त्रे या विद्याशाखांतर्गत समाजशास्त्र विषयाच्या पीएच. डी पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

संशोधिकेने या अध्ययनात विधवा, घटस्फोटित, अविवाहित महिलांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीचे अध्ययन करून त्यांच्यात तुलना केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे या महिलांचा काळानुरूप ऐतिहासिक आढावा घेऊन त्यात महिलांवर सकारात्मक, नकारात्मक झालेल्या परिणामांची मांडणी केली आहे. जेणेकरून लक्षात येईल की कोणाची स्थिती तुलनेत किती चांगली किंवा वाईट आहे. विधवा महिलांचा आर्थिक स्तर घटस्फोटित महिलांपेक्षा चांगला आहे. परंतु अविवाहित महिलांपेक्षा चांगला नाही. ग्रामीण भागातील विधवा महिलांपर्यंत आर्थिक मदत किंवा योजना पोहचत नाही. अविवाहित महिलांचा शैक्षणिक स्तर चांगला असल्याने कायद्याविषयक ज्ञान सर्वाधिक यांना आहे. त्यानंतर घटस्फोटित व सर्वांत खाली विधवा महिलांना असल्याचे दिसून येते. संपत्तीसाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या विधवांची संख्या नसल्यागतच असल्याचे येथे नमूद केलेले आहे. १०० विधवा महिलांपैकी ८३%

शहरीय व १७% ग्रामीण आहेत. त्यातील ४१% उच्च शिक्षित विधवा आहेत. ६९% महिला सासरी राहतात तर १७% माहेरी राहत असल्याचे आढळून आले आहे. पतीच्या मृत्यूला विधवेला जबाबदार मानले जाते याचे प्रमाण २४% आहे, तर ५०% विधवांना अपमानकारक वागणूक दिली जाते. त्याचबरोबर प्रखर्षाने या अध्ययनात दिसून आले आहे, की पती निधनापासून फार तीव्र गतीने कुटुंब व समाज किंवा कामाच्या ठिकाणी विधवांना वेगळी वागणूक दिली जाते... तिच्याकडे वाईट नजरेने पाहण्याचा दृष्टिकोन अजूनही बदललेला दिसून येत नाही. ही एक मोटी सामाजिक समस्या विधवांना भेडसावत असल्याचे संशोधनांती स्पष्ट झाले आहे.

५.३ डोना जॉन, २०१८:

"Social Network and social support of Tamil Brahmin Widows In Kerala" Mahatma Gandhi University, Kerala. या विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे या विद्याशाखांतर्गत असलेल्या समाजशास्त्र विषयाच्या पीएच्.डी. पदवीसाठी सादर करण्यात आलेला अप्रकाशित शोधप्रबंध,

जॉन या अभ्यासकाने कर्नाटकातील तमिळ ब्राम्हण विधवा महिलांचे सामाजिक नातेसंबंध व सामाजिक सहयोग या विषयी अध्ययन केले आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच ३२० विधवांची नमुना म्हणून निवड केल्याची दिसते. पती निधनापूर्वी महिलेचा धार्मिक कार्यात सहभाग १००% असतो; पण विधवेला मात्र यास नकार दिला जातो. या अध्ययनातून असे स्पष्ट झाल्याचे दिसते. या विधवांचे कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते असल्याने त्या संयुक्त कुटुंब पद्धतीने राहतात पती निधनानंतर सामाजिक, भावनिक एकटेपणा आणि तणाव या समस्या सर्वात जास्त असल्याचे संशोधनात नमूद केले आहे. तसेच या विषयासाठी सैद्धांतिक चौकटीचा वापर करून त्याविषयी सविस्तर पणे मांडणी केल्याची दिसून येते.

५.४ साळोक लक्ष्मणसिंग, २०१९:

'विदर्भ आणि मराठवाडा विभागातील आत्महत्याग्रस्त शेतकन्यांच्या विधवांची स्थिती एक समाजशास्त्रीय अभ्यास - महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या अनुदानातून सादर करण्यात आलेला संशोधन प्रकल्प अहवाल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीट, औरंगाबाद, समाजशास्त्र विभाग.

या संशोधनाचा उद्देश आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांना भेडसावणाऱ्या वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक समस्यांचा शोध घेणे व त्यावर उपाय सुचवणे असा आहे. त्याबरोबर विधवा महिलांच्या स्थितीचा ऐतिहासिक आढावा देखील यात घेण्यात आलेला आहे. पती निधनामुळे ६४% विधवांच्या मुलांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागले असल्याचे या संशोधनात नमूद केले आहे. ८८% उत्तरदत्यांना राष्ट्रीय कृषी योजनेची माहिती नसल्याने त्यांनी लाभही घेतला नाही. तसेच पतीच्या आत्महत्येमुळे विधवांच्या मुलींचा विवाह झाला नसल्याचे दिसून येते. पती निधनामुळे ६४.९७% विधवांवर घराची जबाबादारी येवून पडल्याचे लक्षात आले. एकंदरीत सर्वच क्षेत्रात पतीच्या आत्महत्येमुळे विधवांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते, असे या संशोधनांती स्पष्टपणे नमूद केल्याचे दिसून येते.

५.५ कुमार राधा, २०१९:

कुमार राधा यांनी, यांनी आपल्या स्त्री संघर्ष का इतिहास १८००-१९०९' या ग्रंथात स्त्री संघर्षांची मांडणी केल्याचे दिसते. १८००-१९०९ या कालखंडात स्त्रियांवर लादण्यात आलेल्या जाचक प्रथा, रूढी, परंपरा आणि या विरोधात देण्यात आलेले लढे, समाजसुधारकांनी यासाठी दिलेले योगदान याचा उल्लेख यात केल्यचा दिसतो. हिंदू विधवा विवाहविषयक असणाऱ्या सर्व कायद्यांचा यात अभ्यास केला आहे. त्याबरोबर लेखकाने यात 'विधवा ब्याहो सिद्धांताची' मांडणी केल्याचे दिसते. यात नमूद केले आहे, की विधुरांचे वर्तमानपत्रातून विवाहासाठी जाहिराती दिसून येतात; पण विधवा विवाहाचा जाहिरातीत कुठेच

उल्लेख दिसत नाही. कारण या विधुरांना विवाहासाठी विधवा हवी नसून कुमारी हवी अशी अट असायची आणि ती पुरुषाच्या जातीची असावी. यामुळे विधवांना पुनर्विवाहासाठी अडथळा निर्माण होत असे. यातून विधवांचे प्रमाण जास्त असण्याचे कारण स्पष्ट होते आणि विधवांचा पुनर्विवाह करण्याचा अधिकार हिरावल्याचा दिसून येतो. तसेच १९८७-१९८८ मध्ये सतीप्रथेस विरोधी झालेल्या आंदोलनाचा सविस्तर आढावा नमूद केल्याचा दिसतो. ज्यातून आंदोलनाची वास्तवता लक्षात येते. ज्याला पुढे राजकारणाचे रूप दिल्याचे लक्षात येते. या आंदोलनानंतर नारीवादी संघटना रस्त्यावर उतरल्याच्या दिसून येतात. यावरून लक्षात येते की, सतीचा विरोध त्यावेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात झाला, की लेखकाच्या मते राजस्थानमधील ग्रामीण महिलासुद्धा याचा विरोध करण्यासाठी प्रदर्शन करू लागल्या. म्हणजे नारीवादाची मूळे समाजात अशा पद्धतीने पसरत असल्याचे लक्षात येते. यामुळेच आज सती प्रथेसारख्या इतर प्रथांविरूद्ध स्त्री नारीवादी संघटन पेटून उठत आहेत. विधवा न्यायासाठी पुढे येताना दिसून येत आहेत. स्त्रियांनी स्वरक्षणासाठी, हक्कांसाठी केलेल्या संघर्षाचे हे फळ असल्याचे लक्षात येते.

५.६ विश्वप्रकाश, २०२० :

'विधवाओंका इंन्साफ' या पुस्तकात लेखकाने विधवांवरील जाचक बंधनांचा विरोध केल्याचे आढळते. विधवा आणि विधुर यात जो भेद केला जातो तो येथे दर्शवून पुरुषसत्ताक पद्धतीचा विरोध करत अतिशय परखड शब्दात भाष्य केले आहे. पुनर्विवाहाचा विरोध म्हणजे विधवांसोबत समाजाची हानी, असे लेखकाने नमूद केले आहे. जे माझ्या मते अतिशय अचूक आहे. बालविवाह, बहुपत्नीत्व, पुनर्विवाह विरोध यामूळेच विधवांचे प्रमाण वाढते. विधुर पुनर्विवाह करू शकतो तर विधवा का नाही ? असा प्रश्न येथे लेखकाने मांडून विधवांसाठी न्यायाची मागणी केली बाल किंवा तरुण विधवांनी पूनर्विवाह तर पूनर्विवाहाची इच्छा नसणाऱ्या इतर विधवांना एकनिष्ठतेचे

पालन करत आपल्या मृत पतीवरच प्रेम करावे याला लेखकाने मान्यता देत आदर्श मानल्याचे दिसून येते...

थोडक्यात विधवांवर केला जाणारा अन्याय, अत्याचार याचा विरोध त्यावर उपाय करून न्याय कसा करावा, स्त्री-पुरुष, विधवा, विधुर समानता याचा स्वीकार करत पुरुषसत्ताक पद्धतीला झुगारून एकंदरीत विधवांवर जाचक बंधने लादणाऱ्या पंडितांना परखड शब्दात चपराक दिली आहे. लेखकाने विधवा कल्याणासोबत सामाजिक परिवर्तनाचा मार्ग अवलंबल्याचे या पुस्तकातून स्पष्ट दिसून आलेले आहे.

५.७ श्रीराम शर्मा आचार्य, २०२१:

'क्या विधवा विवाह शास्त्र विरुद्ध है!' या ग्रंथात लेखकाने आपल्या लिखाणातून अतिशय परखड शब्दात पुरुषसत्ताक पद्धतीचा, विधवांवर होणाऱ्या अन्यायाचा आणि पुनर्विवाहतेच्या अमान्यतेचा विरोध केला आहे. भारतात पूर्वीपासून चालत आलेल्या प्रथांमुळे विधवांच्या जगण्यावर जे निर्बंध लादण्यात आले तेच निर्बंध विधवांच्या अवस्थेचे मूळ कारण असल्याचे मत स्पष्ट सांगीतले आहे. विधवेने पुनर्विवाह करावा किंवा नाही या प्रश्नाला लेखक मूर्खपणाचे लक्षण मानत असल्याचे दिसून येते. या पक्षपाती धोरणाचा त्यांनी विरोध केला आहे. विधवेवर अन्याय करणाऱ्या समाजाला एक मोठा प्रश्न म्हणजे हे पुस्तक आहे. ज्यातून विधवेवरील अन्याय व त्यावर समाजाने करावयाचे उपाय अगदी अचूक सांगीतल्याचे दिसून येते. पुढे त्यांनी आपले मत मांडले आहे, की कौटुंबिक व सामाजिक अन्यायामुळेच विधवा वेश्यावृत्तीकडे वळतात. लेखकाच्या मते, ९९ विधवांना जर पुनर्विवाहाविषयी समजावून सांगितले. तर त्या विवाहास तयार होतील, असा त्यांनी लिखाणातून विश्वास व्यक्त केला आहे. त्याचबरोबर पुनर्विवाहास जबरदस्ती करण्यासही विरोध दर्शविला आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी विधुरांनी विधवेशी विवाह करण्याचा योग्य व अचूक असा उपाय लेखकाने येथे नमूद केल्याचा दिसून

६. संशोधनाचे अध्ययन क्षेत्र :

संशोधनाच्या सुलभतेसाठी व त्याचे उद्‌दिष्टे पूर्ण होण्याच्या हेतूने कार्यक्षेत्राची निश्चिती होणे आवश्यक असते. कारण संशोधन विषय व्यापक असतो. त्याला एका मर्यादित क्षेत्रात ठेवावे लागते. या दृष्टीने संशोधिकेने संशोधन क्षेत्र म्हणून नांदेड जिल्ह्याची निवड केली. संशोधनासाठी नांदेड जिल्हा समग्र असून १६ तालुके उपसमग्र आहेत. यानुसार सदरील अध्ययन करण्यात येणार आहे. अशा प्रकारे एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयाचा अभ्यास करण्यासाठी संशोधिकने नांदेड जिल्ह्याची संशोधन क्षेत्र म्हणून निवड केली आहे.

७. संशोधनाची उद्‌दिष्टे :

१. एकल महिलांची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

२. एकल महिलांच्या आर्थिक स्थितीच्या अभ्यास करणे

३. एकल महिलांना भेडसावणाऱ्या वैयक्तिक,कौटुंबिक, सामाजिक,आर्थिक व शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करणे.

४. समाजाचा एकल महिलांकडे बघण्याच्या दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

५. एकल महिलांसाठी असणाऱ्या शासकीय योजनेचा अभ्यास करणे.

६. एकल महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मदत करणाऱ्या गैरसरकारी संस्थाच्या(एनजीओ) अभ्यास करणे.

८. संशोधनाची गृहितके :

१. पतीच्या निधनामुळे एकल विधवा महिलांवर आलेली कुटुंबाची जबाबदारी त्या व्यवस्थितरीत्या पूर्ण करत आहेत.

२. एकल महिलांची आर्थिक व सामाजिक स्थिती खालावली आहे.

३. बिकट आर्थिक परिस्थिती व निरक्षरता यामुळे एकल महिलांना आर्थिक व शैक्षणिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

४. शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांचे प्रमाण कमी आहे.

५.एकल महिलांच्या रोजगारांमध्ये अस्थिरता आहे.

६. एकल महिलांना सामाजिक समारंभात महत्वाचे स्थान दिले जात नाही.

९. संशोधन पद्धती :

संशोधन क्षेत्रातील वस्तुनिष्ठ तथ्य संकलन करण्यासाठी प्राथमिक स्त्रोतांपैकी विषयास अनुकूल अशा अचूक पद्धतीचा वापर करावा लागतो. त्यासाठी प्रथम समग्रातील काही उत्तरदात्यांची नमुना म्हणून निवड केली जाते. प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी नमुना निवडीच्या संभाव्य व गैरसंभाव्य या दोन प्रकारांपैकी गैरसंभाव्य प्रकारातील 'सहेतूक नमुना निवड (Purposive Sampling) या पद्धतीची निवड केली जाणार आहे. संशोधन क्षेत्र नांदेड जिल्हयाच्या संपूर्ण तालुक्यातील ५४० एकल महिलांची नमुना म्हणून निवड करण्यात येणार आहे. हि निवड करताना नांदेड जिल्हयातील उपविभागीय तालुके व त्यातील एकल महिलांचे प्रमाण अधिक असलेल्या गावांची निवड करून नमुन्यांची निवड करण्यात येणार आहे.

१०. तथ्य संकलन :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीच्या आधारे माहिती संकलित करण्यात येणार आहे. एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या विषयासाठी पुढील संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनासाठी आवश्यक असलेल्या तथ्य संकलनासाठी प्राथमिक व द्वितीय अशा दोन्ही स्त्रोतांचा उपयोग करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतांपैकी तथ्य संकलनासाठी विषयास अनुकूल व अचूक अशा मुलाखत अनुसूची या साधनाची संशोधिकेने निवड केली जाणार आहे. या साधनाचा उपयोग करून सदरील संशोधनासाठी लेखी स्वरूपात ५४० एकल महिलांच्या सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक, शारीरिक अशा सर्व समस्यांविषयी माहिती संकलित करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोतांबरोबरच द्वितीय स्त्रोतांचा देखील संशोधकाने उपयोग केला आहे. यामध्ये लघु शोधप्रबंध शोधप्रबंध ग्रंथ, नियतकालिके, वर्तमानपत्रे, विशेषांक, जनगणना अहवाल शासनाचे विविध अहवाल, संशोधन प्रकल्प, तसेच इंटरनेटवरील विविध वेबसाईटस, राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय अहवाल इत्यादींचा तथ्य संकलनासाठी तर विविध विद्यापीठाच्य ग्रंथालयातील व शोधगंगावरील स्थानीक राज्य व राष्ट्रीय पातळीवरील शोधप्रबंधाचा उपयोग अध्ययनासाठी करण्यात येणार आहे.

११. संशोधन कालावधी :

एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) हे विषय घेऊन प्रस्तुत संशोधनाची काल मर्यादा सन २०१३ ते २०२३ या दहा आर्थिक वर्षापुरते मर्यादित असेल.

१२. संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास (विशेष संदर्भ नांदेड जिल्हा) या संशोधन विषयापुरते मर्यादित राहील. संशोधनाची व्यापकता लक्षात घेता सदरील संशोधनाचे संशोधन क्षेत्र नांदेड जिल्हा आहे. हे अध्ययन नांदेड जिल्हयातील एकल महिलांच्या समस्यांशी निगडीत असेल. नांदेड जिल्हयातील १६ तालुक्याच्या ग्रामीण व शहरी भागातील ५४० एकल महिलाची सहेतुक नमुना निवड करून त्याच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, मानसिक व शारीरिक समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचवणे या पातळीपर्यंत हे संशोधन मर्यादित आहे.

१३. संशोधनामधील मर्यादा :

संशोधन क्षेत्र म्हणून नांदेड जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. या संशोधनाची भौगोलीक व्याप्ती लक्षात घेता हे संशोधन नांदेड जिल्हयातील एकल महिलांपुरतेच मर्यादित आहे.

सदरील संशोधनामध्ये एकल महिलांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये एकल महिलांच्या कुटुंबातील सदस्यांची माहिती

मिळवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला असला, तरी एकल महिलांच्या कुटुंबीयांच्या सर्व समस्यांचा विचार करण्यात आलेला नाही. ही या संशोधनाची मर्यादा आहे. कारण या संशोधनाचा मुख्य उद्‍देश एकल महिलांच्या समस्या जाणून घेण्याचा असल्याने संशोधिकेने तोच दृष्टिकोन समोर ठेऊन संशोधन कार्य पूर्ण केले जाणार आहे.

१४. सांख्यिकीय तंत्र :

उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, मध्यमान, सहसंबंध, आलेख, तक्ता सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

येतो.

१५. प्रकरणांचा आराखडा :

प्रकरण १. प्रस्तावना

प्रकरण २. संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण ३. नांदेड जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रकरण ४. एकल महिलांसाठीच्या योजना

प्रकरण ५. एकल महिलांच्या आर्थिक व सामाजिक अभ्यास.

प्रकरण ५. निष्कर्ष, गृहितकृत्यांचे पडताळणी आणि शिफारशी.

संदर्भ ग्रंथ सूची :

१. बोधनकर, सुधीर, अलोणी, विवेक, मृणाल कुलमणी (१९९९), सामाजिक संशोधन पद्धती. द्वितीय आवृत्ती. नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन, पृ. क्र. ६

२. बोधनकर, सुधीर अलोणी, विवेक मृणाल कुलमणी (१९९९) सामाजिक संशोधन पद्धती, द्वितीय आवृत्ती. नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन. पृ. क्र. ६८

३. आगलावे, प्रदीप (२००८) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, दुसरी आवृत्ती, नागपूर श्री साईनाथ प्रकाशन. पृ. क्र. ३८६

४. Census of India, (2011). India Village Directory, Tahsil-wise list of census village in nanded district, Maharashtra, India.

५. कवडे, योगेश (२०१८) राजपी शाहू महाराजांनी केलेला विधवा पुनर्विवाह कायदा आणि सद्यस्थिती: एक आकलन, समजाशास्त्र विभागांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठास सादर करण्यात आलेला अप्रकाशित लघुशोध प्रबंध.

६. शर्मा, पिंकी (२०१८), विधवा, तलाकशुदा एवं अविवाहित महिलाओं को सामाजिक एवं आर्थिक स्थिती का एक समाजशास्त्रीय अध्ययन समाजशास्त्र विभागांतर्गत मोहनलाल सुखाडिया विश्वविद्यालय, उदयपूर (राजस्थान) सादर करण्यात आलेला अप्रकाशित शोधप्रबंध.

७. John, Donna. (2018). Social Network and social support of Tamil Brahmin widows in kerala. A Thesis Submitted to Mahatma Gandhi University, Unpublished Thesis in Dept of Sociology.

८. साळोक, लक्ष्मणसिंग (२०१९) विदर्भ आणि मराठवाडा विभागातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवांची स्थिती एक समाजशास्त्रीय अभ्यास महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांच्या

अनुदानातून सादर केलेला संशोधन प्रकल्प अहवाल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. समाजशास्त्र विभाग

९. कुमार, राधा (२०१९). स्त्री संघर्ष का इतिहास १८००-१९९० नई दिल्ली: वाणी प्रकाशन,

१०. Vishvprakash.(2020)VidhvaokaInsafUpload: 17Mayhttps://epustakalay.com/5//375/vidhvao-ka-insaf-by vishvprakash/http:www.44book.com/free-hindi-books/visited this page on 3 Feb 2021. Time: 02:29pm

११. Sharma, S. Aachary. (2021). Vidhava vivah shastr virudhahai. http://literature.awgp.org/book/kya_vidhva-vivah-shastra-virudh-2021. visited page this on 16/05/2021. Time: 11:39pm

१२. District Nanded. (2021). About District. https://nanded.gov.in/en/about- district//visited this page on 29/07/2023. Time 19:22pm

१३. नांदेड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०२२

१४. योजना मासिक मार्च २०२२

१५. Government of Maharashtra. (2023, jully 23). https://nanded.gov.in/en/ visited this page on 28/7/2023. Time 2:30pm

१६. लोकराज्य मासिक जानेवारी २०२३

१७. www.nandedgazet.com

संशोधक

रोहिणी दत्तात्रय सोनवणे
(एम. ए. अर्थशास्त्र, बी.एड.)

संशोधन मार्गदर्शक

डॉ. बाभूळगावकर किशन एस.
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, बसमत
ता. बसमत जि. हिंगोली